## संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ

## जिल्हाधिकारी श्रीमती पवनीत कौर यांचे शुभहस्ते स्टुडंट इन्डक्शन कार्यक्रमाचे उद्‌घाटन संपन्न

अमरावती - (दि. २५.०७.२०२२)

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाने नव्याने सुरु केलेल्या सी.बी.सी.एस. अभ्यासक्रम प्रणालीनुसार विद्यार्थ्यांसाठी इन्डक्शन प्रोग्राम महत्वाचा आहे. खूप चांगला हा कार्यक्रम असून यामुळे विद्यार्थ्यांना ते ज्या महाविद्यालयात प्रवेश घेत आहेत, त्या महाविद्यालयाची, तेथील शैक्षणिक कार्याची ओळख होईल. त्यांना चांगल्या शैक्षणिक वातावरणामध्ये शिकण्याकरिता प्रोत्साहन मिळेल. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण शैक्षणिक विकासासाठी इन्डक्शन प्रोग्राम महत्वाचा असल्याचे अमरावतीच्या जिल्हाधिकारी श्रीमती पवनीत कौर यांनी सांगितले. विद्यापीठातील अधिसभागृहात पाचही जिल्ह्यांतील महाविद्यालयांकरिता आयोजित करण्यात आलेल्या स्टुडंट इन्डक्शन कार्यक्रमाचे उद्‌घाटन जिल्हाधिकारी यांचे शुभहस्ते संपन्न झाले, त्याप्रसंगी त्या आभासी पद्धतीने मार्गदर्शन करतांना बोलत होत्या. याप्रसंगी व्यासपीठावर अध्यक्षस्थानी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. दिलीप मालखेडे, कुलसचिव डॉ. तुषार देशमुख, ह.व्या.प्र. मंडळाच्या अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.ए.बी. मराठे व विद्यार्थी विकास संचालक डॉ. राजीव बोरकर उपस्थित होते.

जिल्हाधिकारी श्रीमती कौर पुढे म्हणाल्या, विद्यार्थ्यांनी आपले आयुष्य चांगल्या रितीने घडविण्यासाठी आपल्यामधील मजबूत बाजू तसेच कमतरता जाणून घेतल्या पाहिजे. आपल्यातील कमतरता दूर करण्यासाठी प्रयत्न केले पाहिजे. सी.बी.सी.एस. पद्धतीनुसार आवडीचे अभ्यासक्रम निवडण्याची व शिकण्याची संधी विद्यार्थ्याला प्राप्त झाली आहे. आपले पॅशन काय आहे ?, हे विद्यार्थ्यांनी ठरविले पाहिजे आणि त्यानुसार शिक्षण घेवून यशस्वी व्हायला पाहिजे. अभियांत्रिकी शिक्षण पूर्ण केल्यानंतर आय.टी. कंपनीमध्ये मी नोकरी केली, नोकरी सोडून दिल्यानंतर सामाजिक कार्य करता यावे, म्हणून एन.जी.ओ. मध्ये काम केले आणि यु.पी.एस.सी. ची तयारी करुन आय.ए.एस. ची परीक्षा उत्तीर्ण केल्याचे जिल्हाधिकारी यांनी यावेळी सांगितले.

कठोर परिश्रमाशिवाय कुठलीच गोष्ट शक्य होत नाही. विद्यार्थ्यांनी शिकत असतांना स्पर्धा परीक्षेची तयारी करावी, शिक्षण पूर्ण करावे आणि स्पर्धा परीक्षेसाठी कठोर परिश्रम घेवून यश मिळवावे, असे आवाहन त्यांनी याप्रसंगी केले. कुलसचिव डॉ. तुषार देशमुख व विद्यार्थ्यांनी विचारलेल्या प्रश्नांना त्यांनी यावेळी समर्पक उत्तरे दिलीत.

प्राचार्य डॉ. मराठे म्हणाले, अपेक्षित असलेला पदवीधर बाहेर पडण्यासाठी इन्डक्शन कार्यक्रमाचा तीस तासाचा अभ्यासक्रम ठेवला असून यामध्ये क्रेडीट्स दिले जाणार आहे. या कार्यक्रमाची अंमलबजावणी करण्यासाठी प्रत्येक दिवसाचे कोर्स ऑब्जेक्टीव्ह दिले असून त्यानुसार महाविद्यालयांना कार्यवाही करावयाची आहे. प्रत्येक दिवसाला पाच तासाचा कालावधी राहणार असून महाविद्यालयांनी विद्यार्थ्यांना कोणती माहिती द्यावयाची आहे, इन्डक्शन कार्यक्रमांतर्गत करावयाची सविस्तर कार्यपद्धती व कार्यवाही, तसेच सी.बी.सी.एस. अभ्यासक्रम लागू केल्यामुळे झालेले बदल आदी माहिती विद्यार्थ्यांना महाविद्यालयीन स्तरावर द्यावयाची असल्याचे त्यांनी सांगितले.

अध्यक्षीय भाषणातून कुलगुरू डॉ. दिलीप मालखेडे म्हणाले, स्टुडंट इन्डक्शन कार्यक्रम विद्यार्थ्यांसाठी महत्वाचा असून त्यामुळे विद्यार्थ्यांची आपसात मैत्री, महाविद्यालय व विद्यापीठाची ओळख, विद्यार्थ्यांचे शैक्षणिक मनोबल उंचावणे आदी या माध्यमातून साध्य होईल. हा कार्यक्रम घेणे विद्यार्थी व महाविद्यालयांना बंधनकारक करण्यात आला आहे. महाविद्यालयांमध्ये सर्व विद्यार्थ्यांना सोबत घेवून हा कार्यक्रम दिलेल्या गाईडलाईन नुसार करावयाचा आहे. सी.बी.सी.एस., एन.ई.पी., क्रेडीट्स, मल्टीपल एन्ट्री व एक्झीट या सर्व बाबी संस्थेचे पदाधिकारी, प्राचार्य, शिक्षक व विद्यार्थ्यांनी समजून घेण्याची गरज आहे.

नवीन अभ्यासक्रम कौशल्यावर आधारित असल्यामुळे तसेच प्रोजेक्ट व इंटर्नशीप आदीचा समावेश असल्यामुळे विद्यार्थ्यांना आवडीचे शिक्षण मिळेल. शिक्षण ही माणूस घडविण्याची प्रक्रिया असावी, केवळ माहिती देणारी नसावी, असेही त्यांनी याप्रसंगी सांगितले.

प्रास्ताविक भाषणातून कुलसचिव डॉ. तुषार देशमुख यांनी कार्यक्रम आयोजनामागील भूमिका विशद केली. संचालन करीत आभार विद्यार्थी विकास संचालक डॉ. राजीव बोरकर यांनी मानले. स्टुडंट इन्डक्शन कार्यक्रमाला पाचही जिल्ह्यांतील प्राचार्य, शिक्षक, विद्यार्थी तसेच विद्यापीठातील शैक्षणिक विभागप्रमुख, शिक्षक व विद्यार्थी आभासी पद्धतीने मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### २६ ते ३० जुलै दरम्यान मान्यवरांचे मार्गदर्शन

विद्यापीठाच्यावतीने सर्व संलग्नित महाविद्यालये व विद्यार्थ्यांसाठी स्टुडंट इन्डक्शन कार्यक्रमामध्ये दि. २६ ते ३० जुलै, २०२२ दरम्यान देशपातळीवरील तज्ज्ञांचे मार्गदर्शन लाभणार आहे. दि. २६ जुलै रोजी सकाळी १०.०० वाजता उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबईचे प्रधान सचिव श्री विकास रस्तोगी यांचे, दि. २७ जुलै रोजी अमरावतीचे विभागीय आयुक्त डॉ. दिलीप पांढरपट्टे, दि. २८ जुलै रोजी डेव्हलपमेन्ट कमिशनर (उद्योग) डॉ. हर्षदीप कांबळे, दि. २९ जुलै रोजी ए.आय.सी.टी.ई. चे उपाध्यक्ष प्रो.एम.पी. पूनिया, तर दि. ३० जुलै रोजी विद्यापीठ अनुदान आयोगाचे सचिव डॉ. रजनीश जैन यांचे आभासी पद्धतीने मार्गदर्शन लाभणार आहे. तरी सर्व प्राचार्य, शैक्षणिक विभागप्रमुख, शिक्षक व विद्यार्थ्यांनी या कार्यक्रमाला आभासी पद्धतीने उपस्थित राहून जास्तीतजास्त कार्यक्रमाचा लाभ घ्यावा, असे आवाहन विद्यापीठाच्यावतीने कुलसचिव डॉ. तुषार देशमुख यांनी केले आहे. कार्यक्रमाची युट्युब लिंक https://youtu.be/hAn15oLhBaU ही आहे.

---

प्रति, **जनसंपर्क विभाग**

मा. संपादक/जिल्हा प्रतिनिधी दि. २५/०७/२०२२.

दै............................... अमरावती.

मा. महोदय,

आपणांस विनंती करण्यात येते की, सोबतच्या वृत्तास आपल्या लोकप्रिय वृत्तपत्रातून कृपया प्रसिद्धी द्यावी, ही विनंती.

आपला,

**(डॉ. विलास नांदुरकर)**
जनसंपर्क अधिकारी

[C:\Users\PRO\Desktop\OM\UNIVERSITY NEWS 2022 180

This document was created with the Win2PDF “Print to PDF” printer available at

https://www.win2pdf.com

This version of Win2PDF 10 is for evaluation and non-commercial use only.
Visit https://www.win2pdf.com/trial/ for a 30 day trial license.

This page will not be added after purchasing Win2PDF.

https://www.win2pdf.com/purchase/